**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-II FEBRUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# स्वांतत्र्यलढयातील धगधगती ज्वाला कित्तूरची राणी चेन्नमा

**श्री.प्रा. अजित एकनाथ पाटील**
एम.ए.एम.एड इतिहास
स्पर्धा परिक्षा मार्गदर्शक,
विद्या प्रबोधिनी, कोल्हापूर

राणीचेन्नमाचा जन्म बेळगांव नजीक काकती येथे धुळाप्पा देसाई आणि पद्मावतीदेवी यांच्या पोटी २३/०८/१७७८ मध्ये झाला. तिला लहानपणा पासूनच तलवार चालवणे, भाला चालविणे नेमबाजी व अश्वरोहण याची आवड होती शिवाय या सर्वामध्ये ती निपुण ही होती या शिवाय तिला मराठी ,कानडी उर्दू या भाषा अवगत होत्या या सर्व भाषांतील पुस्तकांचे वाचन तिचे होते तिने रामायण,महाभारत,बसवपुरण यांचे वाचन केले आणि तिला इतिहासांची गोडी वाटू लागली जणू काही पुढील काळात येणाऱ्या संकटांसाठी तिला नियती तयार करत होती याचबरोबर तिच्याकडे सौंदर्य आणि मोहकता ही होतीच.

कित्तूर हे मराठयांचे मंडलिक राज्य होते कित्तूरवर सत्ता गाजवणाऱ्या घराण्याचे कलमठ स्वामी हे गुरू होते. त्यांचे अनेक मठ कित्तूर संस्थानात होते कित्तूरच्या राज्यकर्त्यांचे ते एक विश्वासू सल्लागार होते कित्तूर उत्तर कर्नाटकातील महत्वाचे व्यापारी केंद्र ही बनले होते. कृष्णा आणि घटप्रभा नदयांचा हिरवागार टापू,संपन्न प्रदेश या संस्थानात येत होता त्यामुळे येथील जनता ही सुखी,संपन्न होती सर्वधर्मीय लोक गुण्यागोविंदाने राहत होते.वीरप्पा गौडाचा मुलगा मल्लसर्जा हा त्या ठिकाणचा शासक होता. तो शुर आणि योग्य प्रशासक असाच होता. त्याला इतर सत्ताधीशांच्या विरोधाला सामोरे जावे लागले त्यामध्ये टिपू सुल्तान,मराठे, धुंडिया, वाघ तसेच विजापूरच्या शासकांनी ही त्याला त्रस्त करून सोडले होते. त्याचे पूर्ण आयुष्यच जणू यांचा विरोध शमवण्यात गेले

एकेकाळी पेशव्यांनी त्यांला प्रतापराव समशेर जंगबहादूर हा किताब दिला होता त्याच पेशव्यांनी त्याला कैद केले व त्याचा मृत्यू कित्तूरला परत येत असताना झाला मल्लसर्जाच्या मृत्युनंतर मात्र राणी चेन्नमाच्या समारे अनेक अडचणी उभ्या राहिल्या तिने मल्लसर्जा बरोबर २३ वर्षांचा काळ घालविला हा काळ अतिशय महत्वाचा होता तिचा मुलगा शिवबसवराज अल्पायुषी ठरला होता. तिने आपली सवत रूदम्मा हिचा मुलगा शिवलिंग रूद्रसर्जा यास गादीवरती बसवले त्याने गादीवर येताच सैन्याची जमवाजमव करण्यास सुरू केले पण १८१८ पेशव्यांचा इंग्रजांनी केलेला पराभव यामुळे शिवलिंग व मन्रो यांच्यात करार झाला खंडणी देवून कित्तूर संस्थानाने स्वतंत्र राहण्याचा प्रयन्न केला.

राणी चन्नम्माने आपल्या व्यक्तिमत्वाने आणि धडाडीने सर्वाना दिपून टाकले होते.याच काळात चेन्नमा राज्यकारभारावर नीट लक्ष ठेवून होती रोज सकाळी प्रार्थना,स्वामी दर्शन व त्यानंतर गुरू सिदप्पा या लष्करी अधिकाऱ्याची भेट तसेच इतर आधिकाऱ्यांची भेट घेवून राज्यासंबंधीची चर्चा करत असे. ती कोणताही निर्णय जलद घेत होती, आणि नि:पक्षपातीपणे न्यायदान करत होती. त्यामुळे कित्तूर संस्थानात ती लोक प्रिय बनत गेली. राजद्रोहयांची गय केली जात नव्हती त्यांना हत्तीच्या पायी तुडवून मारले जात होते अशी हजरजबाबी न्यायाप्रिय राणी म्हणून चेन्नमा पुढे आली

शिवलिंग रूद्रसर्जावर इंग्रज लक्ष ठेवूनच होते त्यांना कित्तूर संस्थानाचे वैभव, संपत्ती हस्तगत करावयाची होतीच ११/०९/१८२४ ला शिवलिंग रूद्रसर्जाचा मृत्यू झाला इंग्रजांना आपोआपच संधी चालून आली पण राज्यगिळंकृत करावयास निघालेल्या धारवाडच्या मुख्य कलेक्टर मिस्टर थॅकरेने या दत्तक वारसाची सिंहासनावरून हकालपटटी केली यामुळे राणी चेन्नमा व कित्तूरची जनता पेटून उठली यातूनच कित्तूर रणसंग्राम घडून आला.

लॉर्ड डलहौसी पूर्वी मिस्टर थॅकरे या कलेक्टरच्या डोक्यात होते कि संस्थान दत्तक वारस नामंजूर करणे व बळकावणे पण ते राणीने आपल्या शौर्याने तात्पुरता का असेना हाणून पाडले.

शिवालिंगाच्या मृत्यूनंतर इंग्रजाना कित्तूरवर आपले लक्षकेंद्रित केले थॅकरेने इंग्रजांच्या वतीने व्यंकटरावाची कारभार पाहण्यासाठी नेमणूक केली चेन्नमाला हा थॅकरेचा उध्दटपणा सहन झाला नाही याच कालावधीत थॅकरेने कित्तूरवर आपला बंदोबस्त वाढवला यामुळे जनता पेटून उठली व २३/१०/१८२४ रोजी कित्तूरचे दरवाजे इंग्रजांनी धक्के देवून उघडले हा अजिंक्य किल्ला हादरला पण स्वाभिमानी जनता गुरू सिदप्पा, सय्यद बाबासाब आणि राणी चेन्नमा यांच्यापुढे इंग्रजाचा टिकाव लागला नाही. थॅकरे या कलेक्टरला आपला जीव गमवावा लागला तसेच कॅप्टन ब्लॅक, डायटन, सिवेल या इंग्रज अधिकाऱ्यांना आपला जीव गमवावा लागला राणीने मोठया मनाने इंग्रज सैन्याला सभ्यपणाची वागणूक दिली व त्यांना सोडून देण्यात आले राणी व जनता पहिल्या लढाईत यशस्वी झाले.

पण कित्तूरच्या राणीने इंग्रजांचा केलेला पराभव इंग्रजांना बोचत होता एका स्त्रीकडून पराभूत होणे त्यांना सहन होत नव्हते म्हणून त्यांनी या लहान संस्थानावर अखेरचा आघात करण्यासाठीची व्यूहरचना करण्यास सुरूवात केली राणी चेन्नमाला ही निकराची झुंज देण्यासाठी सज्ज होणे महत्वाचे वाटत होते.इंग्रज सैन्यांची करत असलेली जुळवाजुळव पाहता राणीने ही आपला सेनापती संग रायाप्पा आणि गुरूसिदाप्पा यांना सज्ज राहण्यास सांगितले. आणि इंग्रजांना मराठी मुलखातून हाकलून देण्यासाठी शेजारच्या राजांना त्यांची मदत घेण्याच्या उद्देशाने पत्रव्यवहार केला पण तिला अपेक्षित उत्तर मिळाले नाही

याच कालावधीत इंग्रजांनी मात्र ३०नोव्हेबर १८२४ च्या दरम्यान आपल्या फौजा कित्तूरमध्ये दाखल केल्या कॅप्टन पाऊ गेट या मुंबईच्या इंजिनिअर्सकडून टेहळणी करण्यात आली ले.क विल्शायर,ले.क सेली, यांच्या नेतृत्वाखाली सैन्य बेळगांव, म्हैसूर, मद्रास येथील फलटनी या सर्व ले.क सी.बी.डीकन नेतृत्वाखाली आल्या राणीला शरणागतीसाठी विचारणा करण्यात आली किल्यामध्ये सुध्दा दोन गट निर्माण झाले एक गट लढणाऱ्यांचा होता. तर एक तडजोड करावी असे म्हणत होता. पण स्वाभिमानी राणीने स्पष्ट शब्दात सांगीतले **की मी मरे पर्यत कित्तूरचे स्वांतत्र्य टिकवने पसंद करेन** आणि सरदार आणि सैन्यानेही याला प्रतिसाद दिला **शत्रुच्या सैन्याची डोकी जमिनीवर गाडली जाईपावेतो आम्ही लढू आणि कित्तूरचा रणसंग्राम ३० नोव्हेबर १८२४ रोजी हरहर महादेवच्या गर्जनेने सुरू झाला.**

चेन्नमाच्या नेतृत्वाखाली हा रणसंग्राम सरू होचा इंग्रजापुढे आणि त्यांच्या अत्याधुनिक शस्त्रापुढे राणीचा टिकाव लागणे अशक्य होते आणि झाले ही तेच १ व २ डिसेबर कालावधीत काही विश्वासघातक्यांनी किल्यातील गुप्त बातम्या बाहेर सांगितल्या या मध्ये काण्णूर वीर संगप्पा व हटकडली मल्लपा या फितूरांना राणीने हत्तीच्या पायी तुडवून ठार मारण्याची शिक्षा सुनावली. राणीचे सैन्य प्राणपणाने लढत होते पण ०२ डिसेंबर १८२४ ला फितूरांनी दारू खान्यातील दारूगोळा निकामी केला होता, या मुळे दारूगोळयाअभावी राणी निराश झाली इंग्रजानी याचा फायदा घेतला व कित्तूरवर निकराची चढाई केली ०५ डिसेंबर १८२४ कित्तूरचा शोक दिन

म्हणावा लागेल कारण याच दिवशी राणी पुर्वेकडील दरवाज्यातून निसटून जात असताना तिला पकडण्यात आले. गुरू सिदप्पा व सेनापती सागोळी रायाप्पा यांनाही पकडण्यात आले. गुरू सिदप्पा व इतर २० जणांना फाशी देण्यात आली. राणी चन्नमा व कुंटूबातील इतरांना बैलहोंगल येथील किल्यात राज कैदी म्हणून ठेवण्यात आले. राणीने किल्यातुन दोन वेळा निसटण्याचा प्रयत्न केला पण पुन्हा पकडून तिच्यावरती सक्त नजर ठेवण्यात आली. पुढे या न्याय प्रिय धडाडीच्या कर्तुत्ववान राणीचा मुत्यू २२/०२/१८२९ रोजी झाला.

आपल्या जनतेसाठी आपल्या संस्थानावर पाणी सोडणारी,राजवैभवाचा त्याग करणारी , इंग्रजांविरूध्द लढा देणारी भारतातील पहिली स्त्री म्हणून राणी चेन्नमाचे नाव भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहीले गेले ते तिच्या नि: स्वार्थीपणा **मातृभूमीवरील** प्रेम जनतेबदल असणारा जिव्हाळा यामुळेच होय

इंग्रजाना टिपू सुल्तानचा पराभव करण्यासाठी जितके सैन्य उपयोगात आणावे लागले तितके सैन्य राणी चन्नमाच्या ही पराभवासाठी आणावे लागले यावरून आपल्याला राणीची शूरता, युध्द चातुर्य लक्षात येते. राणी चेन्नमाने भारतीय स्वांतत्र्य लढयातील क्रांतीच्या ज्वाला प्रजल्वित करून अनेकांना देशांसाठी त्याग, आत्मबलिदान करण्याची प्रेरणा दिली आणि एक स्त्री असून ही तिचा आदर्श इतरांनी घ्यावा असे **न भूतो भविष्यती** कार्य केले आजच्या स्त्रिया, आजचा समाज यांनी ही त्यांच्याकडून **धाडसीवृत्ती नि:स्वार्थीपणा, जाज्वल्य देशभक्ती न्यायप्रियता आत्मविश्वास सत्यनिष्ठा ,मातृभमि व जनता याच्यावरील प्रेम,उच्च ध्येय हे गुण घेण्यासारखे आहेत** यातुनच पुढे अशा अनेक राणी चन्नमा ,जिजाऊ रणरागीणी ताराराणी, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले निर्माण होतील.